## जागतिक मूलनिवासी दिवस आम्ही साजरा करावा का? कसा?

९ ऑगस्ट म्हणजे भारतीयांसाठी क्रांती दिवस. जपानी लोकांसाठी नागासाकीवर पडलेल्या अणुबॉम्बच्या स्फोटात बळी पडलेल्या आपल्या पूर्वजांना श्रद्धांजली वाहण्याचा दिवस. या घटनांचा विसर पडावा म्हणून तर आता तो जागतिक मूल निवासी दिवस म्हणून साजरा करायचे फर्मान निघाले नसेल?

१९८२ च्या मानवाधिकार आयोगाच्या एका उपआयोगाच्या सूचनेनुसार संयुक्त राष्ट्र संघाने ९ ऑगस्ट हा दिवस संपूर्ण जगाने जागतिक मूल निवासी दिवस म्हणून साजरा करावा अशी सूचना केली. तोपर्यंत हा विषय भारतीय लोकांच्या चर्चेत आला नव्हता. काही वर्षांपूर्वी मला ऑस्ट्रेलियात प्रवास करण्याची संधी मिळाली होती. तोपर्यंत अबोरीजीनल हा शब्द ऐकला नव्हता. युरोपमधील गोऱ्या वसाहतवाद्यांनी जिथे जिथे वसाहती केल्या, तिथे तिथे आपल्या प्रगत शस्त्रांच्या सहाय्य्याने तेथील स्थानिक लोकांचे शिरकाण केले किंवा त्यांना गुलाम बनवून आपल्या सेवेला लावले. इतर मानव वंशांपेक्षा आपण श्रेष्ठ आहोत असे ठरवून या वसाहतवाद्यांनी जिथे जिथे ते गेले तिथे तिथे तेथील स्थानिक रहिवाशांवर अनन्वित अत्याचार केले. त्यांची भाषा, धर्म, संस्कृती कशी नष्ट होईल तेच पाहिले. आणि त्यांचा स्वाभिमान व आत्मविश्वास नष्ट करून त्यांना अतिशय हीन दर्जाचे जीवन जगण्यास बाध्य केले.

यात प्रामुख्याने ऑस्ट्रेलिया, कॅनडा, अमेरिका, न्यूझीलंड, या देशांचा समावेश होता. आफ्रिकेतील स्थानिक रहिवाशांना वसाहतवादी लुटेरे शस्त्राच्या धाकावर युरोप व अमेरिकेत गुलाम म्हणून विकून टाकत. त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचाराच्या कहाण्या तर सर्व जगाला माहित आहेत. अमेरिकेत राहणाऱ्या स्थानिक रहिवाशांना त्यांनी रेड इंडियन्स असे नाव दिले. त्यांच्या पासून आफ्रिकेतून आणलेल्या कृष्णवर्णीय गुलामांना वेगळे ओळखण्यासाठी त्यांना निग्रो म्हटल्या जाऊ लागले. आज या शब्दाने एका शिवीचे रूप घेतले आहे. म्हणजे वसाहतवादी फक्त शारीरिक अत्याचार करत नव्हते तर भाषिक अत्याचार करण्यातही पुढेच होते.

काही वर्षांपूर्वी कॅनडात लहान मुलांच्या 200 कबरी आढळल्या, ज्यावर नाव सुद्धा कोरलेले नव्हते. हे अनामिक मृत्यू कसे झाले होते हे सांगायची आवश्यकता नाही. ऑस्ट्रेलियात पन्नास वर्षांपूर्वी अबोरीजीनल लोकांना जनगणनेत स्थान द्यायचे की नाही हा प्रश्न चर्चेला आला होता. त्यांना स्थान द्यावे असा ठरावही पास झाला होता. पण २०१७ मधेही हे बिल पास झाले नाही. स्थानिक रहिवाशांवर केलेल्या अत्याचाराला उतारा म्हणून त्यांना काही अधिकार द्यावेत असे संयुक्त राष्ट्र संघाने ठरवले यावर आपण आक्षेप घ्यावा असे काहीच नाही. पण काही  अधिकारच का? संपूर्ण समान अधिकार का नाहीत? आणि भाराताला त्यांच्या या मोटेला जुंपावे यात मात्र सर्वच गोष्टी आक्षेपार्ह आहेत.

रामायण महाभारतापासून ते मोगल काळापर्यंत भारताचा इतिहास पाहिला तर येथे नगरवासी, ग्रामवासी व वनवासी अशा तीन पद्धतीची समाज रचना होती असे आढळेल. आणि या सर्वांचे आपापसातील संबंध सौहार्दपूर्ण होते हेच दिसून येते. रामाने वनवासाची १४ वर्षे वनवासी बांधवांच्या सान्निध्यात घालवली, इतकेच नव्हे तर सीतेच्या शोधासाठी आणि सुटकेसाठी याच वनवासी बांधवांनी रामाला साथ दिली होती हे आपल्या सर्वांना माहित आहे. महाभारत काळात एकलव्याचे वडील कंसाचे सेनापती होते तर हिडींबा ही भीमाची पत्नी व घटोत्कच हा मुलगा वनवासी समाजातील होते. इतकेच कशाला अनेक गोंड राजांनी इंग्रजांना पराभूत केले होते, त्यांच्या जवळ तोफा, तलवारी, भाले, तिरकमठे  अशी शस्त्रे होती, हे इतिहासाची पाने थोडी चाळली तर दिसून येईल.

इतर देशांमध्ये वसाहतवाद्यांना जसे सहजतेने आपले साम्राज्य स्थापन करता आले तसे भारतात घडले नाही याचे एक प्रमुख कारण येथील वनवासी राजांनी त्यांना प्राणपणाने केलेला विरोध हे आहे, हे सहज कळून येईल.

साम, दाम, दंड आणि भेद ही अस्त्रे वापरून कोणत्याही समाजाला जिंकणे सहज शक्य असते. ही युद्ध नीती जाणणाऱ्या इंग्रजांनी येथे मग भेदाचे राजकारण सुरु केले. येथील वनवासी स्थानिक रहिवाशांना त्यांनी 'आदिवासी'  ही संज्ञा दिली. व तुम्हीच येथील रहिवासी असून बाकी सर्व (आमच्या सारखेच) उपरे आहेत हे त्यांनी सांगायला सुरुवात केली. आर्य म्हणजे ब्राह्मण किंवा क्षत्रीय हे उत्तर धृवावरून भारतात स्थानांतरीत झाले, हा सिद्धांत त्यांनी मांडला, जो नंतर पूर्ण चुकीचा आहे, हे पुराशास्त्राने सप्रमाण सिद्ध केले.  'तुम्ही हिंदू नाही.' असे आणखी एक मनभेद करणारे पिल्लू त्यांनी सोडून दिले. त्यांचीच री ओढण्याचे काम आज स्वतंत्र भारतातील राजकारणी केवळ सत्ताकांक्षेने करीत आहेत.

भारतात सर्व प्रकारची विविधता आहे, हे मान्य करणे त्यांना भाग पडते. पण या विविधतेतील एकतेकडे मुद्दाम डोळे झाक करून त्याउलट येथील वनवासींना तुम्ही वेगळे आहात हे सांगून भारतीय समाजात फूट पाडण्याचे षडयंत्र ते चालवत आहेत.

संपूर्ण जगात तेथील मूलनिवासी लोकांना आपल्या हक्कांसाठी आणि मानवाधिकारासाठी तीव्र संघर्ष करावा लागला. भारतातील चित्र मात्र या पेक्षा वेगळे होते. भारताच्या राज्यघटनेने येथील सर्व समाजाला सारखे अधिकार दिले. इतकेच नव्हे तर काही ऐतिहासिक कारणांनी येथील जे समाज मागासलेले होते त्यांच्यासाठी विशेष योजना संविधानातच करण्यात आल्या. नागालँड व अरुणाचल येथे विधानसभेच्या सर्व जागा तर मेघालय, मणिपूर, त्रिपुरा, येथील बहुतांश जागा जनजातींसाठी आरक्षित आहेत. पाचव्या अनुसूचीमध्ये येणाऱ्या क्षेत्रात पेसा सारखा कायदा आपल्या राज्यघटनेत दुरुस्ती करून लागू करण्यात आला. देशातील अनेक राज्यांमध्ये सहाव्या अनुसुचीच्या अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन करून त्या त्या क्षेत्राच्या विकासाची जबाबदारी पूर्णपणे जनजाती नेतृत्वावर सोपवण्यात आली आहे. याची तुलना जर विदेशातील मूल निवासी लोकांना मिळत असलेल्या अधिकारांची केली तर लक्षात येईल की त्यांना अजूनही असे घटनादत्त अधिकार मिळालेले नाहीत.

आपल्याकडे या बाबतीत क्रियान्वयाचा प्रश्न आतापर्यंत उपस्थित होत होता. अनेक चांगले आणि लोकोपयोगी कायदे आतापर्यंत धूळखात पडले होते. गेल्याच महिन्यात यातील दफ्तरदिरंगाई दूर करण्यासाठी केंद्रीय जनजाती मंत्रालय व वन पर्यावरण मंत्रालय या दोन मंत्रालयांनी एकत्र येऊन एका संयुक्त करार पत्रावर स्वाक्षऱ्या केल्या, ज्यामुळे निर्णयप्रक्रिया लवकर पूर्ण होऊ शकेल. या मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी अधिक संवेदनशील असतील तर कामे विनाविलंब झटापट होतील. त्यासाठी वेगळ्या पातळीवरून प्रयत्न होणे गरजेचे आहे.

पेसा आणि वनाधिकार कायद्यांची जर यथायोग्य व त्वरित अम्मलबजावणी झाली तर आपल्याकडील जनजाती समाजाचा सर्वांगीण विकास व्हायला वेळ लागणार नाही.

आता महत्वाचा प्रश्न उरतो तो म्हणजे ९ ऑगस्ट हा दिवस आपण कसा साजरा केला पाहिजे हा! जगातील मूल निवासी लोकांना त्यांचे अधिकार मिळावेत म्हणून त्यांना आपण पाठींबा देऊ शकतो. त्याला हरकत नाही. पण 'भारतातील मूल निवासी' किंवा आदिवासी असा शब्दप्रयोग जर कोणी करत असेल तर त्यांना निक्षून बजावले पाहिजे की येथील सर्व लोक हे मूल निवासीच आहेत. जाती किंवा धर्माच्या नावावर येथील नागरिकांमध्ये भेदभाव करून त्यांच्यात दुही निर्माण करायचे प्रयत्न आपण हाणून पाडले पाहिजेत. भारताला आतापर्यंत शेकडो वर्षे पारतंत्र्यात खितपत पडावे लागले त्याचे कारण आपल्यातील दुही हेच होते. पुन्हा अशी वेळ आपल्यावर येऊ नये असे वाटत असेल तर दुहीची बीजे अंकुरण्याच्या आत नष्ट करणे हेच सर्व सुशिक्षित, विचार करणाऱ्या जनजाती बांधवांचे आणि नगरवासी व ग्रामवासी भारतीयांचे परम कर्तव्य ठरते.

संपूर्ण जगातील मूल निवासी लोकांसाठी सुद्धा हा दिवस काळादिवसच आहे कारण एक दिवसाचा उत्सव करून त्यांचे प्रश्न सुटणारे नाहीत. जे त्यांच्या देशाचे खरे नागरिक होते त्यांच्यावर कुरघोडी करत अजूनही वसाहतवादी मानसिकता त्यांना त्यांचे हक्क देऊ इच्छित नाही. एखाद्याचे सर्वस्व लुटून घ्यायचे आणि त्याला त्याबद्दल फक्त sorry म्हणायचे पण त्याची चीज वस्तू मात्र परत करायची नाही, असा हा ९ ऑगस्ट साजरा करण्याचा प्रकार आहे. पाश्चात्यांनी केलेल्या या पापाचे आपण भागीदार होऊ नये म्हणून हा लेखन प्रपंच.

डॉ.छाया नाईक

नागपूर